# वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ,
## कृषि नगर, वसमत रोड,परभणी - ४३१ ४०२ (महाराष्ट्र)

ई-मेल : reg_mau@rediffmail.com
वेबसाईट : http//:www.vnmkv.ac.in

दूरध्वनी : (०२४५२) २२९७५५
फॅक्स : (०२४५२) २२९७५५,२२३५८२


क्रं.ओपीपी-१८/२०१९

दिनांक ~~१८~~.०१.२०१९ २५

## कृषि सहाय्यक (पदवीधर) पदाच्या लेखी परीक्षेबाबत निवेदन

वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी जाहिरात क्रं.वनामकृवि-१/२०१४, दि.२५.११.२०१४ अन्वये कृषि सहाय्यक (पदवीधर) भरती बाबत जाहिरात प्रसिध्द करण्यात आली होती. कृषि सहाय्यक पदाकरिता अर्ज केलेल्या उमेदवारांमधुन लेखी परीक्षेकरिता पात्र/अपात्र ठरलेल्या उमेदवारांच्या याद्या पूर्वीच विद्यापीठ संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आल्या आहेत.

पात्र उमेदवारांची कृषि सहाय्यक (पदवीधर) या पदासाठीची लेखी परीक्षा **दि.०३.०२.२०१९ रोजी सकाळी ११.०० ते दुपारी १.००** या वेळेत परभणी मुख्यालयातील विविध परिक्षा केंद्रावर आयोजीत करण्यात आलेली आहे. त्याअनुषंगाने लेखी परीक्षेकरिता उमेदवारांच्या मुळ पत्यावर प्रवेशपत्र पाठवण्यात आले आहेत. ज्या उमेदवारांना दि.३०.०१.२०१९ पर्यंत प्रवेशपत्र पोष्टाद्वारे प्राप्त होणार नाहीत अशा उमेदवारांनी दिनांक ३१ जानेवारी, २०१९ ते ०२ फेब्रुवारी, २०१९ दरम्यान कार्यालयीन वेळेत कुलसचिव कार्यालय, वनामकृवि, परभणी येथे अर्ज करुन अर्जासोबत ओळखपत्राची प्रत सादर करुन प्रवेशपत्राची दुय्यम प्रत प्राप्त करुन घ्यावी. प्रवेशपत्राशिवाय लेखी परीक्षेस बसु दिले जाणार नाही याची सर्व उमेदवारांनी नोंद घ्यावी.

तसेच ज्या उमेदवारांचे प्रवेशपत्रावर फोटो स्कॅन झालेले नाहीत अशा उमेदवारांनी त्यांच्या अलीकडील कालावधीचा पासपोर्ट आकाराचा फोटो प्रवेश पत्रावर चिटकवून स्वःसाक्षांकित करावा. परिक्षा बाबतची गुण विभागणी तसेच इतर सुचना विद्यापीठाने प्रसिध्द केलेल्या जाहिरातीमध्ये देण्यात आलेल्या आहेत.

कुलसचिव